आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

५ एप्रिल २०२६ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भारत इराणसह इतर चाळीस देशांमधून कच्च्या तेलाची आयात करत असून खरेदीच्या रकमा अदा करण्यात समस्या नसल्याचं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्र्यांचं स्पष्टीकरण

- आखातातल्या युद्धामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचा वृद्धिदर ८ दशांश टक्के कमी होईल असा मूडीजचा अंदाज

- ईस्टरचा सण सर्वत्र भक्तिभावानं साजरा

**आणि**

- महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या अध्यक्षपदी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची बिनविरोध निवड

<><><><><>

भारत इराणसह इतर चाळीस देशांमधून कच्च्या तेलांची आयात करत असून या खरेदीच्या रकमा अदा करण्यात कसलीही समस्या नसल्याचं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदिप सिंग पुरी यांनी म्हटलं आहे. समाजमाध्यमावर अशी समस्या निर्माण झाल्यानं भारताच्या वाडीनार इथं येणारं इराणी कच्च्या तेलाचं एक जहाज चीनकडे वळवण्यात आल्याचं वृत्त समाजमाध्यमावर प्रसिद्ध झालं होतं. त्याचा समाचार घेताना पुरी यांनी म्हटलं आहे की, हे वृत्त चुकीचं आहे. पश्चिम आशियामधल्या युद्ध स्थितीतही भारतीय तेलशुद्धीकरण प्रकल्पांना लागणाऱ्या कच्च्या तेलाचा पुरवठा विविध देशांमधून सुरळीतपणे होत आहे.

<><><><><>

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी इराणला होर्मुझ सामुद्रधुनी खुली करण्यासाठी ४८ तासांचा अंतिम इशारा दिला आहे. इराणकडे यासाठी आता केवळ ४८ तासांचा अवधी असून त्यानंतर त्यांना गंभीर परिणामांना तोंड द्यावं लागेलं असं ट्रंप यांनी समाजमाध्यमावर एका संदेशात म्हटलं आहे. मात्र संघर्ष समाप्त करण्याचा अमेरिकेचा प्रस्ताव एकतर्फी असल्याचं सांगत इराणनं त्याला नकार दिला आहे.

<><><><><>

इराणने पाडलेल्या अमेरिकेच्या एफ - १५ या विमानातल्या कर्मचाऱ्यांची यशस्वीपणे सुटका केल्याचा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा दावा इराणने फेटाळला आहे. दक्षिण इस्फहान इथल्या बचाव मोहिमेत अमेरिकेला अपयश आल्याचं इराणने म्हटलं आहे. उलट या मोहिमेत सहभागी असलेलं अमेरिकन विमान इराणने पाडल्याचं खातम अल अनबिया केंद्रीय मुख्यालयाचे प्रवक्ते इब्राहिम झोल्फाघरी यांनी सांगितलं. जनतेत संभ्रम पसरवण्यासाठी ट्रम्प अशी विधानं करत असल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

मूडीज या पतमानांकन संस्थेनं चालू आर्थिक वर्षासाठी भारतीय अर्थव्यवस्थेच्या वृद्धी दराचा अंदाज ६ पूर्णांक ८ दशांश टक्क्यावरुन ६ टक्क्यापर्यंत खाली आणला आहे. पश्चिम आशियात सध्या सुरु असलेल्या संघर्षामुळे आर्थिक वृद्धीची गती मंदावेल आणि महागाईत वाढ होईल, असा अंदाज मूडीजनं वर्तवला आहे. या युद्धामुळे एलपीजीच्या पुरवठ्यात घट होऊन नजीकच्या काळात घरगुती पातळीवर त्याचा तुटवडा होईल, इंधनाच्या किंमतीत वाढ होऊन वाहतूक खर्चात देखील वाढ होईल, तसंच अन्नधान्याचे दरही वाढतील असं मूडीजनं आपल्या अहवालात म्हटलं आहे.

भारताच्या, कच्च्या तेलाच्या एकूण आयातीपैकी ५५ टक्के, आणि एलपीजीची ९० टक्के आयात पश्चिम आशियातून केली जाते.

<><><><><>

पश्चिम आशियातला संघर्ष, कच्च्या तेलाचे वाढते दर आणि रुपयाच्या मूल्यामध्ये सातत्यानं होणारी घसरण यामुळे परदेशी गुंतवणूकदारांनी एप्रिल महिन्याच्या पहिल्या दोन दिवसातच भारतीय शेअर बाजारातून १९ हजार ८३७ कोटी रुपये काढून घेतले आहेत. मार्च महिन्यात परदेशी गुंतवणूकदारांनी आतापर्यंतचे सर्वाधिक म्हणजे सुमारे १ लाख १७ हजार कोटी रुपये काढून घेतले. त्याआधीच्या फेब्रुवारी महिन्यात मात्र २२ हजार ६१५ कोटी रुपयांची, १७ महिन्यांमधली सर्वोच्च गुंतवणूक झाली होती. अमेरिका-इराण युद्ध सुरू झाल्यापासून रुपयाचं मूल्य सुमारे ४ टक्क्यानं घसरलं आहे. ते आणखी घसरेल, या भीतीमुळे परदेशी गुंतवणूकदार समभागांच्या विक्रीवर भर देत आहेत.

<><><><><>

जगभरात आज ईस्टरचा सण मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. वेटिकन सिटीमध्ये पोप लिओ चौदावे यांनी काल बेसिलिका मध्ये ईस्टर प्रार्थना केल्यानंतर जगभरात ईस्टर सणाला सुरुवात झाली. पोप यांनी जागतिक पातळीवरच्या अशांततेच्या वातावरणात शांततेसाठी आणि बंधुत्वासाठी प्रार्थना केली. अमेरिका-इस्रायल - इराण, आणि रशिया- युक्रेन यांच्यातल्या संघर्षाचा आपल्या भाषणात उल्लेख करत, त्यांनी जगात शांतता नांदावी अशी प्रार्थनाही या निमित्तानं केली. प्रभू येशू ख्रिस्ताला सुळावर चढवल्यानंतर त्यांचं याच दिवशी पुनरुथ्थान झाल्याच्या आनंदाप्रित्यर्थ हा सण साजरा केला जातो.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी देशवासीयांना ईस्टरच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हा दिवस सत्य, त्याग आणि प्रेमाचा संदेश देणारा आहे असं त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनीही ईस्टरच्या शुभेच्छा दिल्या आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ख्रिस्ती धर्मियांना ईस्टरच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हा सण प्रत्येकाच्या जीवनात आनंद, उत्साह आणि आशा निर्माण करो असं त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

राज्यपाल जिष्णुदेव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनीही ईस्टरनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. राज्यातल्या विविध चर्चेसमधे आज विशेष प्रार्थना आणि प्रवचनांचं आयोजन करण्यात आलं आहे.

<><><><><>

पुदुच्चेरी, आसाम आणि केरळ विधानसभेसाठी येत्या ९ एप्रिलला मतदान होणार आहे. पहिल्या टप्प्यात आसाम, केरळ आणि पुदुच्चेरी इथं येत्या गुरुवारी ९ एप्रिलला मतदान होणार असून त्या दृष्टीनं सर्वच राजकीय पक्षांनी आपापल्या उमेदवारांसाठी प्रचाराचा धडाका लावला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, काँग्रेस नेते राहुल गांधी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा प्रचारात सहभागी होत आहेत. निवडणुकीला सामोरं जात असलेल्या या सर्व ठिकाणी निवडणूकपूर्व बंदोबस्तादरम्यान निवडणूक आयोगाने निवडणूक जाहीर झाल्या पासून आतापर्यंत ५३ कोटी रुपयांची रोकड, ७९ कोटी रुपये किमतीची अवैध दारू, आणि २३० कोटी रुपये किमतीचे अमली पदार्थ पकडले आहेत.

गोव्यातल्या पोंडा, कर्नाटकातल्या बागलकोट आणि दावणगिरी दक्षिण तसंच नागालँडमधल्या कोरिडांग आणि त्रिपुरातल्या धर्मनगर विधानसभा मतदारसंघातही येत्या ९ एप्रिलला पोटनिवडणुकीसाठी मतदान होणार आहे.

या सर्व मतदारसंघात मिळून १ हजार ९५५ उमेदवार रिंगणात आहेत.

<><><><><>

प्रदेश काँग्रेसनं पक्षाच्या बांधणीमध्ये आमूलाग्र बदल करण्यासाठी संघटन सृजन अभियान सुरु केलं असून त्या द्वारे पहिल्यांदाच तालुका अध्यक्षांची निवड करण्यात येणार आहे. पक्षाच्या संघटनात्मक बांधणी संदर्भात अनेक कार्यकर्ते आणि नेत्यांनी नाराजी व्यक्त केल्यानंतर हे पाऊल उचलण्यात आलं आहे. या द्वारे संपूर्ण राज्यात ७२ जिल्हा अध्यक्ष आणि ६७५ तालुकाध्यक्षांची निवड करण्यात येणार आहे. तालुकाध्यक्षांबरोबरच काँग्रेसच्या इतर दहा संस्थांसाठीच्या तालुकास्तरीय अध्यक्षांचीही निवड करण्यात येणार आहे.

<><><><><>

नाशिक जिल्ह्यात अवकाळी पाऊस आणि गारपीटीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेल्या भागांची पाहणी आज आपत्ती व्यवस्थापन आणि जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी केली. सिन्नर तालुक्यातल्या चिंचोली तसेच वडगाव पिंगळा या गावांमध्ये शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीची माहिती घेतली. तात्काळ पंचनामे करून नुकसानीचा सविस्तर अहवाल शासनाकडे सादर करण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभं आहे, असं आश्वासनही मंत्री महाजन यांनी यावेळी दिलं.

<><><><><>

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या अध्यक्षपदी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची आज बिनविरोध निवड झाली. बालेवाडी इथल्या शिवछत्रपती क्रीडा संकुलात झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत अध्यक्षपदासाठी निवडणूक अपेक्षित होती. मात्र, अध्यक्षपदासाठी एकच अर्ज आल्यानं निवडणूक बिनविरोध झाली. खो-खो संघटनेत अनेक वर्षांनी हा सन्मान एका महिलेला मिळाला आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज सनरायझर्स हैदराबाद आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यात सामना होणार आहे. हैदराबाद इथं राजीव गांधी मैदानावर दुपारी साडे तीन वाजता

सामन्याला सुरुवात होईल.  लखनौ सुपर जायंटसनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

आजचा दुसरा सामना रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात होणार आहे. बेंगळुरू इथे एम. चिन्नास्वामी मैदानावर संध्याकाळी साडेसात वाजता या सामन्याला सुरुवात होईल.

<><><><><>

नागपूरमध्ये आजपासून १७ वर्षांखालच्या मुला-मुलींसाठीची सातवी राष्ट्रीय कनिष्ठ गट मुष्टियुद्ध स्पर्धा सुरू झाली. केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांच्या हस्ते या स्पर्धेचं उद्घाटन झालं. येत्या ११ तारखेपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत देशभरातून सुमारे ६०० मुष्टियोद्धे सहभागी होत आहेत. ही स्पर्धा ४८–५० किलो ते ८०–८५ किलो अशा एकूण १३ वजन गटांमध्ये होणार आहे. सामने दररोज दुपारी २ वाजल्यापासून सुरू होतील. या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची भारतीय १७ वर्षांखालील संघात निवड करण्यात येईल.

//<><><><><>//